नि.दि.दा.क्र.१०१/२०१८
नि.क्र.८९

**<u>पुढील सरतपास वादीकरीता विधीज्ञ श्री. ए.एस. काळे यांच्या वतीने शपथेवर सुरु</u> -**

१. माझ्या सरतपासातील मजकुर मी सांगितल्याप्रमाणे तयार करण्यात आले. ते मजकुर खरे व बरोबर आहे. मी **<u>नि.क्र.९१/३</u>** वर माझ्या विधिज्ञामार्फत् दि.११/०६/२०१८ रोजी प्रतिवादी क्र.१, २ व जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना पाठविलेल्या नोटीसची कार्यालयीन प्रत दाखल केली आहे. आता मला ती कार्यालयीन प्रत दाखविली असता त्यावर माझी, माझे पुतणे नामे स्वामीनाथ अनिल शर्मा व लक्ष्मीकांत अनिल शर्मा आणि माझी भावजाई सुनिता सिताराम शर्मा यांच्या व माझे विधिज्ञ श्री. ए.एस. काळे यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. ती नोटीस आता **<u>नि.क्र.९२</u>** वर आहे. सदरची नोटीस आरपीएडी द्वारे पाठविण्यात आली होती. त्या पावत्या नि.क्र.९२ वरील नोटीसीसोबत जोडण्यात आलेल्या आहेत.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.१ करीता विधीज्ञ श्री.एम.पी. गवारे यांच्या वतीने शपथेवर सुरु</u> -**

२. माझे शिक्षण इयत्ता १२ वी पर्यंत झालेले आहे. सि.स.नं.१९७१(अ)/१ ही मिळकत माझ्या वडीलांनी सन १९९२ मध्ये खरेदी केली होती. गंगुबाई पुजारी यांनी मंजूर करुन घेतलेला नकाशा मी पाहिलेला आहे. तो मंजूर नकाशा मी या दाव्यात दाखल केला आहे. आता मला नि.क्र.९१/५ वरील नकाशा दाखविला असता त्यावर प्रतिवादी क्र.१ यांच्या कार्यालयाचा शिक्का आणि कोणत्याही अधिका-याची सही नाही. (प्रतिवादी क्र.१ च्या विधिज्ञानी सदर नकाशा साक्षीदारास दाखविल्यामुळे सदर नकाशास **<u>नि.क्र.९३</u>** देण्यात येते आहे.) गंगुबाई पुजारी यांचा नकाशा मंजूर केल्याबाबतचे पत्र मी पाहिलेले नाही. गंगुबाई पुजारी यांना बांधकाम परवानगी दिल्याबाबतचे पत्र मी पाहिलेले नाही.

३. दाव्यातील माहिती व सरतपासातील मजकुर माझ्या विधिज्ञानी मी

सांगितल्याप्रमाणे तयार केले. दावा मिळकत खरेदी घेतल्यानंतर त्यावरील बांधकामात मी कोणतेही बदल केले नाही. आता मला माझ्या शपथपत्रातील रेखांकित भाग-अ वाचून दाखविला असता तो खरा व बरोबर आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी जास्तीचे शास्ती लावल्याबाबत मी प्रतिवादी क्र.१ यांच्या कोणत्याही अधिका-याविरुध्द तक्रार दाखल केली नाही.

४. आम्ही चौघे भाऊ आहोत. माझे दोन भाऊ मयत आहेत. आजरोजी दावा मिळकतीच्या मालमत्ता पत्रकावर आम्ही दोन भाऊ व दोन मयत भावांच्या वारसांची नावे आहेत. सन २०१८ मध्ये मी प्रतिवादी क्र.१ यांना पत्र केल्याचे मला आठवत नाही. साक्षीदार स्वतः सांगतात की, त्यांनी सन २०१८ मध्ये प्रतिवादी क्र.१ यांना वकिलांमार्फत नोटीस पाठविली होती. आता मला माझ्या दाव्यातील रेखांकित भाग-ब वाचून दाखविला असता तो खरा व बरोबर आहे. माझ्या म्हणण्याप्रमाणे मी दावा मिळकतीमध्ये आतल्या बाजूस काही सुधारणा केल्या. ती सुधारणा करण्याकरीता मी दावा मिळकतीमधील एखादी भिंत पाडली असेल. ती भिंत पाडण्याकरीता मी प्रतिवादी क्र.१ यांच्याकडून परवानगी घेतली नव्हती.

५. दावा मिळकतीमध्ये सुधारणा करण्याकरीता मी प्रतिवादी क्र.१ यांच्याकडे तसा सुधारीत नकाशा व अर्ज सादर केला होता. तो सुधारीत नकाशा व अर्ज सापडल्यास मी दाखल करण्यास तयार आहे. सुधारीत नकाश्याची प्रत मिळावी म्हणून मी प्रतिवादी क्र.१ यांच्याकडे अर्ज करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे आहे की, तो सुधारीत नकाशा प्रतिवादी क्र.१ यांनी नामंजूर केला होता. तो सुधारीत नकाशा प्रतिवादी क्र.१ यांनी मी हा दावा दाखल करण्यापूर्वी नामंजूर केला होता हे मला आठवत नाही. सुधारीत नकाशा व अर्ज नामंजूर झाल्याची बाब मी दाव्यात व सरतपासात नमूद केली नाही, हे आता मला आठवत नाही.

६. दावा मिळकतीमधील आजरोजीचे बांधकाम विट मातीचे आहे.

<u>**प्रश्न**</u> – गंगुबाई पुजारी यांच्याकडून मिळकत खरेदी करते वेळेस तेथे विट मातीचे बांधकाम नव्हते ?

<u>**उत्तर**</u> - दोन खोल्या कुडकामटीचे होत्या व बाकीचे स्ट्रक्चर उभे होते.

हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत खरेदी करतेवेळेस तेथे विट, माती व सिमेंटचे कोणतेही बांधकाम नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत खरेदी करते वेळेस तेथील बांधकाम हे जिर्ण व अर्धवट पडलेल्या अवस्थेत होते. दावा मिळकतीवरील बांधकाम हे अर्धवट पडलेल्या अवस्थेत असल्यामुळे सन १९९३ साली प्रतिवादी क्र. १ यांनी त्यावरील कर कमी केले होते, याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, कर कमी झाल्यानंतर मी दावा मिळकतीवर बेकायदेशीर बांधकाम केले. हे म्हणणे खरे नाही की, वाढीव कर दयावा लागू नये म्हणून मी सदर बांधकामाची माहिती प्रतिवादी क्र.१ यांना दिली नव्हती.

**प्रश्न** - सदर बांधकामाकरीता तुम्ही प्रतिवादी क्र.१ यांची परवानगी घेतली नाही व कोणताही बांधकाम आराखडा सादर केला नव्हता ?

**उत्तर** - मी कोणतेही बांधकाम केलेले नाही.

७. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा मिळकतीमध्ये बेकायदेशीररित्या बांधकाम केल्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांनी मला नोटीस पाठविली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्यात आणि पुराव्याच्या शपथपत्रात प्रतिवादी क्र.१ यांच्या कर्मचा-यां विरुध्द खोटे व चुकीचे आरोप केले आहे. दावा मिळकतीमध्ये केलेल्या सुधारणाबाबत मी प्रतिवादी क्र.१ यांना माहिती दिल्याबाबतची बाब दाव्यात आणि पुराव्यात नमूद केले किंवा कसे हे आता मला आठवत नाही. दावा मिळकतीमध्ये केलेल्या सुधारणाबाबत मी प्रतिवादी क्र.१ यांना माहिती दिली होती याबाबत मी कागदोपत्री पुरावा दाखल करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये बेकायदेशीररित्या बांधकाम केले व त्या बांधकामाविरुध्द प्रतिवादी क्र.१ यांनी कोणतीही कायदेशीर कार्यवाही करु नये म्हणून मी खोटा दावा दाखल केला व पुराव्याचे खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केले.

**उलटतपास प्रतिवादी क्र.२ करीता विधीज्ञ श्री. औताडे यांच्या तोंडी विनंतीवरुन तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2025.10.09 17:30:56 +0530

(आशिष बि. मरलेचा)

दिनांक ०९/१०/२०२५

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
श्रीरामपुर, जि.अहमदनगर